MANAGER

विना सहकार नाही उद्धार !
पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. नवी मुंबई

स्थापना १९९७

# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्र.: टी.एन.ए.(टी.एन.ए.)/ आर.एस.आर.( सी.आर.)/९५१ सन १९९७




# १८ वा वार्षिक अहवाल

## सन २०१४-२०१५

प्रशासकीय कार्यालय : पारिजात भवन, प्लॉट नं.१८, सेक्टर १० ए, नेरुळ (प.), नवी मुंबई-४०० ७०६.
www.parijatcreditsociety.com

# विद्यमान संचालक मंडळ



श्री. कृष्णा पां. धुमाळ
अध्यक्ष



श्री. कैलास वि. खोपडे
उपाध्यक्ष



श्री. बाळासाहेब वि. ताकवले
सचिव



श्री. दिपक शं. टेळे
खजिनदार



श्री. श्रीपती शं. गरुड
संचालक



श्री.अमृत दा. पाटील
संचालक



श्री. आनंदा बा. आंबवले
संचालक



श्री. राजेंद्र ना. कोंडे
संचालक



श्री. अनंत ना. प्रभाळे
संचालक



सौ. मंदाताई ज्ञा. खोपडे
संचालिका



सौ. लता बा. ताकवले
संचालिका



श्री. काशीनाथ वा. प[illegible]र
संचालक



श्री. शिवाजी गं. सुळ
संचालक



श्री. शंकर रा. पुली
संचालक
(दि. २४/०३/२०१५ पर्यंत)



श्री. सचिन य. रणनवरे
कर्मचारी प्रतिनिधी



श्री. तानाजी गु. शिंदे
व्यवस्थापक
(बी.ए.,जी.डी.सी.ॲन्ड ए.,एच.डी.सी.ए

# पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

रजि.नं. टी.एन.ए./(टी.एन.ए.)/आर.एस.आर.(सी.आर.) ९५१ सन १९९७

प्रशासकीय कार्यालय : पारिजात भवन, प्लॉट नं.१८, सेक्टर-१० ए, नेरुळ, नवी मुंबई - ४०० ७०६.

## आठराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेची **आठरावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ०९/ ०८ / २०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता नवी मुंबई तामीळ संगम, प्लॉट नं.२/सी-१, सेक्टर-०९ अे, बस डेपोजवळ, वाशी, नवी मुंबई** या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णा पां. धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद केलेल्या विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून कामकाजात भाग घ्यावा ही विनंती.

### सभेपुढील विषय

१) दि. १०/८/२०१४ रोजी झालेल्या सतराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २०१५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, नफा तोटा व ताळेबंद पत्रक यांना मंजूरी देणे.

३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१४-१५ च्या नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.

४) सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल वाचुन स्वीकृत करणे.

५) सन २०१५-१६ सालाकरिता वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

६) सन २०१५-२०१६ या वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची आणि गत वर्षाच्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहीती देणे आणि मान्यता घेणे.

७) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.

८) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण दोषदुरुस्ती अहवाल वाचुन त्याची नोंद घेणे.

९) संस्थेच्या नवीन शाखा विस्तार करणेस मंजुरी देणे.

१०) संस्थेच्या मुंबई व पुणे विभागातील शाखांसाठी स्वःमालकीची जागा खरेदी करण्यास मंजुरी देणे.

११) उपविधीतील पोटनियम दुरुस्तीस मंजूरी देणे.

१२) अवसायानात असलेल्या सहकारी पतसंस्था संस्थेत विलीन करुन घेणेबाबत विचार करणे.

१३) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

१४) सन २०१४-१५ ते २०१९-२० या कालावधीकरिता निवड झालेल्या संचालक मंडळाची माहिती देणे.

१५) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

ठिकाण : नवी मुंबई
दिनांक : २१/०७/२०१५

संचालक मंडळाच्या वतीने
**श्री. बाळासाहेब विश्वास ताकवले**
(सचिव)

### विशेष सूचना

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास, ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी ही सभा घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील त्यांनी नियोजित सभेच्या तारखेपूर्वी सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी कळविणे आवश्यक आहे.



# अध्यक्षीय मनोगत...

सन्माननिय सभासद बंधू भगिनींनो,

आपल्या संस्थेच्या आज १८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने संस्थेचा ३१ मार्च २०१५ चा कार्य अहवाल आपल्या हाती सुपुर्द करताना अत्यंत आनंद होत आहे. **''पारिजात पतसंस्था''** आपल्या दोन दशकांच्या वाटचालीत सतत नाविण्याचा व प्रगत तंत्रज्ञानाचा ध्यास घेऊन पुढे जात आहे. गतीमान काळाची पावले ओळखून संस्था आधुनिक तंत्रज्ञानाकडे झेप घेत आहे.

आपल्या संस्थेने प्रगतीचा आलेख उंचावत ३१ मार्च २०१५ अखेर **एकूण संमिश्र व्यवसाय ''रु. १४० कोटींचा''** टप्पा पार केला आहे. संस्थेच्या **ठेवी रु. ६७ कोटी व कर्ज वाटप रु. ४७ कोटीच्या** पुढे असून संस्थेने रु.२४ कोटीपेक्षा जास्त रक्कमेची स्वतंत्र गुंतवणूक केलेली आहे. संस्थेचा **स्वःनिधी रु.७ कोटी** असून त्याच धडाडीने **कर्जवसुली ९८.३७ % पेक्षा** जास्त केलेली आहे. संस्थेला चालु आर्थिक वर्षात आवश्यक असणाऱ्या सर्व तरतुदी केल्यानंतर **रु.७७ लाख निव्वळ नफा** झाला आहे. संस्थेस स्थापनेपासून सतत ऑडीट वर्ग **'अ'** मिळाला आहे.

संस्थेच्या **मुंबई व पुणे विभागात प्रशासकीय कार्यालय व ९ शाखा** कार्यरत आहेत त्यापैकी **प्रशासकीय कार्यालय व वाशी शाखा कार्यालय** या जागा स्वतःच्या मालकीच्या आहेत. आपणास कळविण्यात आनंद होत आहे की, जुलै २०१५ मध्ये **संस्थेने कोपरखैरणे शाखेस स्वमालकीची** जागा खरेदी केली असुन आता संस्थेच्या **प्रशासकीय कार्यालयासहीत २ शाखा कार्यालय जागा स्वमालकीच्या** आहेत.

संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणुक सन २०१४-१५ ते २०१९-२० या कालावधीसाठी महाराष्ट्र राज्य सहकार निवडणुक प्राधिकरण यांचे मार्फत मार्च २०१५ मध्ये पार पडली असुन **नवीन संचालक मंडळ** अस्तित्वात आले आहे. आपण सभासदांनी दाखवलेला विश्वास व दिलेले सहकार्य यामुळेच **संस्थेच्या संचालक मंडळाची बिनविरोध निवड** होण्यास मदत झाली आहे. त्याबद्दल मी आपला सदैव ऋणी आहे.

संस्था **''सशक्त व लोकप्रिय''** राहण्यासाठी चांगल्या व्यवस्था निर्माण करणे, त्या टिकवणे आणि यशस्वी करणे यासाठी सतत झटणारे अभ्यासु संचालक, संस्थेबद्दल निष्ठा व आपुलकी असलेला कर्तव्यतत्पर सेवकवर्ग व संस्थेचा अविभाज्य घटक असलेला दैनंदिन ठेव प्रतिनिधी आणि तुमच्यासारखे समंजस व जागरुक सभासद यामुळेच आपली **''पारिजात संस्था''** दिमाखात चौफेर सर्वांगीन प्रगती करीत पुढे चालली आहे.

संस्थेच्या विनंतीस मान देऊन आपण वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहीलात व सभेचे कामकाज चालविण्यास सहकार्य केलेत. याबद्दल आपणा सर्वांसे पुनश्चः आभार!

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

आपला सहकारी
**कृष्णा धुमाळ**
(अध्यक्ष)

## १८ वा वार्षिक कार्य अहवाल सन २०१४-२०१५

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा १८ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा - तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना आम्हास कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा संस्थेने आपल्या प्रगतीची वाटचाल ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार चालू ठेवलेली आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीची व कामकाजाची कल्पना पुढील आकडेवारीवरून येईल.

## संस्थेची वित्तीय स्थिती :-

( ₹ लाखात)

| तपशिल | ३१/०३/२०१४ ₹ | ३१/०३/२०१५ ₹ | वाढ ₹ | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | २१७.४५ | २४९.३२ | ३१.८७ | १४.६६ |
| राखीव व इतर निधी | ३६०.५४ | ४४३.२६ | ८२.७२ | २२.९४ |
| सभासद ठेवी | ५८१९.८७ | ६७६४.२८ | ९४४.४१ | १६.२३ |
| गुंतवणूक | २०२२.०० | २४०६.७६ | ३८४.७६ | १९.०३ |
| सभासद कर्जे | ४०१७.७६ | ४७६४.६६ | ७४६.९० | १८.५९ |
| खेळते भांडवल | ६५५७.६९ | ७६४०.८१ | १०८३.१२ | १६.५२ |

पारिजात संस्थेने सहकारी तत्वाचा पूर्ण सन्मान राखून आपल्या आर्थिक व सामाजिक सेवेने आम जनतेमध्ये विश्वासाची, सहकाराची, विकासाची भावना निर्माण केली आहे. सभासद ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहाय्याने व निःस्वार्थीपणे केलेल्या अव्याहत परिश्रमामुळे संस्थेने आपल्या प्रगतीची उद्दिष्टे व आर्थिक धोरणे जोपासली असून केलेली प्रगती नेत्रदिपक आहे. याबद्दल आपले दुमत होणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

## संस्थेच्या प्रगतीचा विस्तृत आढावा

### सभासद :- ८४३१

गतवर्षी संस्थेचे ७८८६ सभासद होते, अहवाल वर्षात ६४२ नवीन सभासद झाले आणि ९७ सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे अहवाल वर्षाअखेर ८४३१ सभासद संख्या झाली आहे.

### भाग भांडवल :- ₹ २४९.३२ लाख

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये पाच कोटी असून गतवर्षाअखेर संस्थेचे वसुल भागभांडवल ₹ २,१७,४४,६००/- इतके होते. त्यामध्ये अहवाल वर्षात ₹ ३१,८६,९००/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१५ अखेर संस्थेचे वसुल भागभांडवल ₹ २,४९,३१,५००/- इतके आहे.

## गंगाजळी व इतर निधी :- ₹ ४४३.२६ लाख

संस्थेची जनमानसात असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलंबून असते. निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पायाही मजबूत असतो, यानुसार संस्थेने राखीव निधी, इमारत निधी, संशयित व बुडीत कर्ज निधी, गुंतवणूक चढ उतार निधी, लांभाश समानिकरण निधी, सभासद कल्याण निधी, धर्मादाय निधी, आकस्मिक निधी, सेवक कल्याण व प्रशिक्षण निधी, रौप्य महोत्सव निधी, माहिती तंत्रज्ञान निधी इ. उभारलेले आहेत.

गतवर्षाचे संस्थेचे एकुण स्वनिधी ₹ ३,६०,५३,७७६/- जमा होते. त्यामध्ये अहवाल साली ₹ ८२,७२,०९४/- वाढ होऊन वर्षा अखेरीस एकुण स्वनिधी ₹ ४,४३,२५,८७०/- इतका झाला आहे.

## ठेवी : ₹ ६७६४.२८ लाख

संस्थेने ठेव संकलनामध्ये अहवाल वर्षामध्ये नेत्रदिपक वाढ केलेली असून संस्था देत असलेली ग्राहक सेवा, तसेच आपणा सर्वांचा दृढ विश्वास यामुळेच हे साध्य होऊ शकले. दिनांक ३१ मार्च २०१४ अखेर संस्थेच्या एकुण ठेवी ₹ ५८,१९,८७,३६२/- होत्या त्यामध्ये ₹ ९,४४,४०,८७३/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २०१५ अखेर संस्थेच्या एकुण ठेवी ₹ ६७,६४,२८,२३५/- झाल्या आहेत. ठेव वाढीचे प्रमाण १६.२३% इतके आहे.

संस्थेने ठेवीदारांकरिता विविध आकर्षक ठेव योजना बनविल्या असून प्रत्येक सभासदांनी ठेव योजनेत पैसे गुंतवून लाभ घ्यावा. संस्थेच्या विविध योजनांमध्ये अहवाल वर्षाअखेर खालीलप्रमाणे ठेवी जमा झालेल्या आहेत व त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| ठेवीचा प्रकार | सन २०११-१२ | सन २०१२-१३ | सन २०१३-१४ | सन २०१४-१५ |
|---|---|---|---|---|
| बचत ठेव | ३,५५,९९,४७१ | ३,३४,६२,४५६ | ४,३५,४५,१४९ | ५,५६,१०,४८८ |
| दैनंदिन बचत ठेव | ९,७०,९७,२१० | ११,५४,१८,९८८ | १३,०८,२३,११४ | १३,५४,७८,०५४ |
| अल्प मुदत ठेव | ४,५१,७८,६५५ | ६,९६,२७,६०१ | ५,७६,५६,१५८ | ६,२८,४८,१५० |
| मुदत ठेव | ४,४४,६१,६५५ | ३,७२,२२,४६६ | ४,६२,३८,९८१ | ४,०८,९९,३१७ |
| दाम दुप्पट ठेव | १,९७,१८,७०५ | २,०७,४२,७१८ | २,५१,९७,२७९ | ३,३९,४७,२१२ |
| पारिजात बक्षिस | ३,५९,२९९ | २,०५,७९९ | १,४१,९६७ | १,३६,९६७ |
| मासिक व्याज प्राप्ती ठेव | ३,३४,४८,४२५ | ३,९१,७३,८५० | ४,४४,२१,१२५ | ५,६९,८९,६७५ |
| आवर्त ठेव | ३३,३२,८७१ | ३०,४२,०६० | ४०,५१,६९० | ४३,९९,८२४ |
| सभासद ठेव | २९,५१,८८२ | २९,३५,२४१ | २८,२७,७०३ | ३०,०१,३३८ |
| शुभकार्य ठेव | ४,५१,२२,९५५ | ४,५९,१०,७६७ | ४,४६,५७,३४५ | ४,३३,०२,७५५ |
| धनवृद्धी ठेव | १०,००० | - - - | - - - | - - - |
| धनलक्ष्मी ठेव | ४९,७०,००० | ९८,००० | - - - | - - - |
| शुभलक्ष्मी ठेव | ७७,७९,८०९ | १,६९,४४,०१८ | १,७९,०८,११४ | २,१२,०४,१५८ |
| धनवर्षा ठेव | ४,४३,७८,७०२ | ४,६२,४८,५६० | ४,५२,४०,५१० | ७९,७२,३२२ |
| पारिजात ठेव | १,६१,५६,९३६ | ४,५३,७८,०४५ | २,२३,०३९ | २९,७३९ |
| वैभवलक्ष्मी ठेव | - - - | १,७३,२५,८४८ | ६,४५,०६,०७४ | ८,९४,४७,६५६ |
| धनसंचय ठेव | - - - | - - - | २,६८,७६,०४८ | ४,२६,८७,२१७ |
| धनसमृद्धी ठेव | - - - | - - - | २,७६,७३,०६६ | ७,८४,७३,३६३ |
| एकूण रु. | ४०,०५,६६,५७५ | ४९,३७,३६,४१६ | ५८,१९,८७,३६२ | ६७,६४,२८,२३५ |

## गुंतवणूक : ₹ २४०६.७६ लाख

संस्थेने सभासदांना कर्ज वाटप करुनही काही रक्कम शिल्लक राहीली. ती रक्कम तशीच शिल्लक न ठेवता विविध बँकांमध्ये त्यांची गुंतवणूक करुन त्यापासुन व्याज मिळवुन उत्पन्न वाढीचा प्रयत्न केला आहे. सध्याच्या बँकींग क्षेत्रातील विविध बदलामुळे गुंतवणूक ही आवश्यक बाब झाली आहे. कायदेशीर बाबींची पूर्तता म्हणूनही गुंतवणुकीस महत्व प्राप्त झाले आहे. म्हणुनच संस्थेने खालील तपशिलाप्रमाणे गुंतवणूक करुन त्यापासुन व्याज मिळवुन सुरक्षिततेची काळजी संचालकांनी घेतली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने निधींच्या गुंतवणूकीबाबत घालून दिलेल्या सर्व नियमांचे योग्य प्रकारे पालन संस्थेने केले आहे.

दि. ३१ मार्च २०१४ अखेर संस्थेची गुंतवणूक रु. २०,२१,९९,७७३/- एवढी होती. अहवाल वर्षात त्यात ₹ ३,८४,७६,६२१/- ने वाढ होवून दि. ३१ मार्च २०१५ अखेर संस्थेची एकुण गुंतवणूक ₹ २४,०६,७६,३९४/- एवढी आहे या वाढीचे शेकडा प्रमाण १९.०३% एवढे आहे.

( ₹ लाखात)

| गुंतवणूक तपशील | रक्कम रुपये |
|---|---|
| दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. भाग | १,०००.०० |
| महा.रा.सह.पत.फेड.लि. भाग | ३,०००.०० |
| राखीव निधी (रिझर्व फंड) | १,०६,३९,२५०.०० |
| संशयित व बुडित कर्ज निधी | ४७,६४,३७५.०० |
| लाभांश समानिकरण निधी | ५,३५,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | ४,६०,०००.०० |
| सेवक कल्याण निधी | २,४६,५००.०० |
| धर्मादाय निधी | ७०,०००.०० |
| मुदत ठेव गुंतवणूक | २२,३९,५७,२६९.०० |
| एकूण रु. | २४,०६,७६,३९४.०० |

## कर्ज :- ₹ ४७६४.६६ लाख

सहकार खात्याच्या मार्गदर्शक सूचनानूसार छोट्या व मोठ्या व्यावसायिक, व्यापारी व नोकरदार सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी व त्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी आपली संस्था सदैव कटिबद्ध आहे म्हणुनच कर्ज वाटपच्यावेळी सर्वसामान्य सभासदांना आम्ही नेहमी अग्रक्रम दिलेला आहे व त्यांना प्राधान्याने कर्ज पुरवठा करुन सभासदांचे राहणीमान उंचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कर्ज दारांनी कर्जाची नियमित परतफेड करावी अशी संस्थेची अपेक्षा असते.

गतवर्षाअखेर संस्थेचे ₹ ४०,१७,७६,०३९/- एवढे कर्ज येणे बाकी होते अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना ₹३४,८४,०७,८४१/- नव्याने कर्ज वाटप केले असून ₹ २७,३७,१७,७८२/- कर्ज वसूल झालेले आहे. अहवालवर्षा अखेरीस एकूण ₹ ४७,६४,६६,०९८/- कर्ज येणे बाकी आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण १८.५९% एवढे आहे.

## कर्ज थकबाकी - प्रमाण १.६३%

संस्थाच्या थकबाकी संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सहकारखात्यातर्फे सांगितलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार संस्थांची थकबाकी ही ५ % पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. या बाबत आपल्या संस्थेने योग्य कारणासाठी योग्य तारण घेऊन उत्तम प्रकारे कर्ज वाटप केल्यामुळे तसेच थकबाकी होऊ न देण्यासाठी वेळोवेळी कर्जवसुलीसाठी शाखास्तरावर केलेला पाठपुरावा यामुळे कर्जथकबाकी मर्यादित ठेवण्यात संस्था यशस्वी झालेली आहे. मार्च २०१५ अखेर येणे कर्जाशी थकीत कर्जाचे शेकडा प्रमाण १.६३ % आहे.

## अनुत्पादक मालमत्ता (N.P.A.) व तरतूदी :-

बँकींग व्यवसायात कर्जास मालमत्ता असेही संबोधले जाते. या मालमत्तेपासून (कर्जापासून) संस्थेस उत्पन्न न मिळाल्यास अशा मालमत्तेस 'अनुत्पादक मालमत्ता' (Non Performing Asset) असे म्हणतात व त्याची वेगळी वर्गवारी करावी लागते. ज्याप्रमाणे रिझर्व्ह बँकेने सर्व बँकांना एन.पी.ए. ची वर्गवारी करण्याचे बंधन घातले. त्याचप्रमाणे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य पूणे यांचे आदेशानुसार दि. ३१ मार्च २००६ पासून पतसंस्थांना सुद्धा एन.पी.ए. निकष लागू केले व अनुत्पादक कर्जांची कालावधीनुसार तरतूद संस्थेच्या नफ्यातून करण्याचे बंधन घातले आहे.

आपल्या संस्थेचे दि.३१ मार्च २०१५ अखेर निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण ३.३३% आहे. सदर अनुत्पादीत कर्जांची संस्थेने १००% पेक्षा अधिक तरतूद केलेली आहे. दि. ३१ मार्च २०१५ अखेर अनुत्पादीत कर्जाची तरतूद खालील प्रमाणे आहे.

(₹ लाखात)

| अ.क्र. | कर्जाचे वर्गीकरण | येणे कर्ज रक्कम | प्रत्यक्ष तरतूद | N.P.A. साठी आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|
| १. | **उत्पादित जिंदगी** | ४५५४.२५ | ११.५० | --- |
| २. | **अनुत्पादीत जिंदगी** | | | |
| | अ) सर्वसधारण जिंदगी | ११५.२६ | } ५३.६० | ५.७६ |
| | ब) संशयीत जिंदगी | ९५.१५ | | १६.९८ |
| | क) बुडीत जिंदगी | --- | --- | --- |
| | एकूण | ४७६४.६६ | ६५.१० | २२.७४ |

एन. पी. ए. साठी आवश्यक तरतुद ₹ २२.७४ लाख असताना संस्थेने प्रत्यक्ष तरतूद ₹ ५३.६० लाख इतकी केली आहे. तसेच संस्थेने चालु आर्थिक वर्षात "उत्पादित जिंदगी" (Performing Asset) वर ऑडीट निकषाप्रमाणे (०.२५ % प्रमाणे ) तरतूद ₹ ११.५० लाख इतकी केली असून संस्थेची स्थिती अधिकाधिक भक्कम केली आहे हे आपणास कळविण्यास आनंद वाटतो.

## खेळते भांडवल :- ₹ ७६४०.८१ लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे खेळते भांडवल ₹ ६५,५७,६९,१०३/- एवढे होते. अहवालवर्षी संस्थेने सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे खेळते भांडवल १६.५२% प्रमाणे ₹ १०,८३,११,९१३/- ने वाढून ₹ ७६,४०,८१,०१६/- इतके झाले आहे.

## संचालक मंडळ सभा :-

संस्थेचा कारभार गतीमान होण्यासाठी अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण ११ सभा होऊन एकूण २४७ ठराव पारीत करण्यात आले. तसेच कर्ज मंजूरी व वितरण समितीच्या मुंबई व पुणे विभागाच्या एकूण ३५ सभा झालेल्या आहेत. त्याचबरोबर नियोजन समिती, कर्मचारी विषयक समिती, लेखापरिक्षण समिती व कर्ज वसुली समिती यांच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी सभा घेण्यात आल्या. मा. सचालक मंडळ व सर्व समितीच्या मिळून अहवाल वर्षात एकूण ७८ सभा घेण्यात आल्या.

## कर्मचारी व संचालक प्रशिक्षण :-

तंत्रज्ञानामध्ये सतत प्रगती होत असते, तसेच नियमांत वारवांर बदल होत असतात. संस्थेचे कर्मचारी व संचालक यांचे ज्ञान अद्यावत रहावे या हेतूने तसेच शाखापातळीवरील कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडणे, स्पर्धात्मक युगाचे आव्हान पेलण्यासाठी, ग्राहकांना चांगली व समाधानकारक सेवा देणे याकरिता संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांना विविध माध्यमातून सतत प्रशिक्षण देण्यात येते.

अहवाल वर्षात संस्थेने सर्व संचालक व कर्मचारी यांना सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या. कराड प्रशिक्षण केंद्र दुधीवरे लोणावळा आणि पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन पुणे, येथे वरील संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्गास कर्मचाऱ्यांना टप्प्या टप्प्याने पाठवून सर्वांना प्रशिक्षण दिलेले आहे.

## नफा विभागणी :- ₹ ७६.७८ लाख

अहवालसाली एकुण खर्च व नियमानुसार कराव्या लागणाऱ्या तरतूदी वजा जाता ₹ ७६,७७,९०५.५६ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा ₹ ३९७.८० मिळुन नफा ₹ ७६,७८,३०४.३६ आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी. ही नम्र विनंती.

| तपशील | रक्कम रुपये |
|---|---|
| राखीव निधी (२५% प्रमाणे) | १९,२०,०००.०० |
| लाभांश (११% प्रमाणे) | २५,३१,१४६.०० |
| इमारत निधी | १२,००,०००.०० |
| लाभांश समानिकरण निधी | ७७,०००.०० |
| संशयित बुडीत कर्ज निधी | ८,५०,०००.०० |
| रौप्य महोत्सव निधी | १,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | १,००,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | ५०,०००.०० |
| आकस्मिक निधी | ३,५०,०००.०० |
| माहिती तंत्रज्ञान निधी | ५,००,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक नफा | १५८.३६ |
| एकूण ₹ | ७६,७८,३०४.३६ |

## लेखापरिक्षण :-

संस्थेचे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण श्री. व्ही. जी. शिंदे (चार्टर्ड अकौंटंट) यांनी केले. त्यांनी संस्थेच्या कामकाजाबद्दल गौरवोदगार काढले व संस्थेस "अ" वर्ग प्रदान केला. तसेच संस्थेचे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे अंतर्गत हिशोब तपासणी मुंबई विभागाकरिता मे. पी. एस. आर. डी. ॲण्ड कं. व पुणे विभागाकरिता मे. व्ही. के. बक्षी ॲण्ड कं. यांनी केलेली असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले. या बद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

## संचालक मंडळ निवडणूक :-

संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणुक सन २०१४-१५ ते २०१९-२० या कालावधीसाठी महाराष्ट्र राज्य सहकार निवडणुक प्राधिकरण यांचे मार्फत दि. २५/०३/२०१५ रोजी पार पडली असुन नवीन संचालक मंडळ अस्तित्वात आले आहे.

## संचालक मंडळ व त्याचे नातेवाईक कर्ज :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (२) नुसार संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांच्या ३१ मार्च २०१५ अखेर येणे असलेल्या कर्जाचा तपशिल खालील प्रमाणे.

| तपशिल | ३१.०३.१४ अखेर येणे कर्ज | सन २०१४-१५ दिलेले कर्ज | सन २०१४-१५ वसुल कर्ज | ३१.०३.१५ अखेर येणे कर्ज | येणे कर्जापैकी थकबाकी रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| संचालक | ७५.१६ | २६.८५ | ७.९८ | ८२.१६ | नाही | |
| नातेवाईक | ६३.७१ | २२.६० | ६.६९ | ५९.९० | नाही | |
| एकूण | १३८.८७ | ४९.४५ | १४.६७ | १४२.०६ | नाही | |

## उल्लेखनीय बाबी :-

संस्थेने अहवाल वर्षात जे उल्लेखनीय उपक्रम राबविले त्याचा तसेच अन्य बाबींचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे :-

### १) सभासदांसाठी 'पॅनकार्ड' सुविधा :-

संस्थेने आपल्या सभासद - खातेदार यांचेसाठी भारत सरकारच्या आयकर विभागामार्फत दिले जाणारे **'पॅनकार्ड'** 'पारिजात संस्थेमार्फत देण्याबाबत सामजस्य करार केला. त्यामुळे पारिजात संस्थेच्या सभासद, ठेवीदारांना पॅनकार्ड आता संस्थेमार्फत देण्याची सुविधा करण्यात आली. अशा प्रकारे पॅनकार्ड सुविधा पतसंस्थेच्या माध्यमातून देणारी **'पारिजात'** ही एकमेव व प्रथम संस्था आहे.

### २) स्वमालकीची शाखा कार्यालये :

संस्थेच्या मुंबई व पुणे विभागात प्रशासकीय कार्यालय व ९ शाखा कार्यरत आहेत त्यापैकी प्रशासकीय कार्यालय व वाशी कार्यालय या जागा स्वतःच्या मालकीच्या आहेत. आपणास कळविण्यात आनंद होत आहे की, जूलै २०१५ मध्ये संस्थेने कोपरखैरणे शाखेस स्वमालकीची जागा खरेदी केली असुन संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयासहीत २ शाखा स्वमालकीच्या जागेत आहेत. संस्थेची सर्व शाखा कार्यालये स्वतःच्या मालकीची असावीत यासाठी संचालक मंडळ प्रयत्नशिल आहे.

### ३) सर्वोत्तम शाखा पुरस्कार :-

संस्थेच्या कर्मचारी वर्गास प्रोत्साहीत करण्यासाठी उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या शाखेस सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात येते. अहवाल वर्षात **"सर्वोत्तम शाखा"** पुरस्कार **"न्यु पनवेल"** शाखेस प्राप्त झाला आहे.

### ४) सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी पुरस्कार :-

मार्च २०१५ अखेर संस्थेकडे १०८ दैनंदिन ठेव प्रतिनिधी काम करीत आहेत. दैनदिन ठेव वसुलीत उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या दैनंदिन ठेव प्रतिनिधीस **"सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी"** म्हणुन सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात येते. अहवाल वर्षात मुंबई व पुणे विभागातुन सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधीचा मान दादर शाखेच्या ठेव प्रतिनिधी **सौ. शितल ज्ञानेश्वर महांगडे** यांना प्राप्त झाला आहे.

## अभिनंदनीय :-

संस्थेचे सभासद व विद्यमान संचालक श्री. काशिनाथ पवार यांची नवी मुंबई महानगर पालिकेत नगरसेवक व स्थायी समिती सदस्य पदावर निवड झाल्याबद्दल विशेष हार्दिक अभिनंदन. तसेच संस्थेचे सभासद श्री. अशोक गावडे, श्री. रामदास पवळे आणि सौ. निर्मला कचरे यांची नवी मुंबई महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आल्याबद्दल हार्दिक अभिनंदन.

## आभार :-

सहकार क्षेत्रास उत्तम वळण लागावे, सहकार चळवळ बळकट व्हावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभाग, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था पुणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका तसेच संस्था कार्यक्षेत्रातील सहकारी खात्याचे विविध पदाधिकारी त्याचेही संस्था ऋणी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड कल्याण, महाराष्ट्र राज्य सह. बँक., ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि., नवी मुंबई को-ऑप. बँक, कॉसमॉस को-ऑप. बँक, नॅशनल को-ऑप. बँक, अभ्युदय को-ऑप. बँक, महानगर को-ऑप. बँक, राजर्षी शाहु सहकारी बँक, दि. सातारा सहकारी बँक., अपना सह.बँक., कुर्ला ना. सह. बँक, पंजाब नॅशनल बँक, सारस्वत को-ऑप बँक, कल्याण जनता सह बँक लि, शामराव विठ्ठल को-ऑप. बँक, पंजाब आणि महाराष्ट्र को-ऑप. बँक, जी. पी. पारसिक जनता सह. बँक यांचे शाखाधिकारी व कर्मचारी यांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षक श्री. व्ही. जी. शिंदे (चार्टर्ड अकौंटट), अतर्गत संस्थेचे लेखापरिक्षक मुंबई विभागाकरिता मे. पी. एस. आर. डी. ॲण्ड कं. व पुणे विभागाकरिता मे. व्ही. के. बक्षी. ॲण्ड कं. आणि कर लेखापरिक्षक श्री. बी. आर. सावंत (चार्टर्ड अकॉटंट) संगणकासाठी मे. कॉमविझार्ड सिस्टम्स, तसेच संस्थेचे कायदेविषयक सल्लागार यांनी संस्थेला आस्थेने मार्गदर्शन केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संस्थेचे कर्मचारी, दै. ठेव प्रतिनिधी, सभासद व ठेवीदार आणि हितचिंतकांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संचालक मंडळ यशस्वी वाटचाल करु शकले त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन्हा मनःपुर्वक आभार मानुन आपल्या लोभाची व सहकार्याची वृद्धी व्हावी अशी प्रार्थना करतो.

## श्रद्धांजली :-

अहवाल सालामध्ये भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, साहित्यिक, पत्रकार, सैनिक, कलावंत, शिक्षणतज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ञ, आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झाले आहेत त्यांना ही सभा नम्रतापूर्वक अभिवादन करुन त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

आपला सहकारी

**कृष्णा पां. धुमाळ**

अध्यक्ष

दि. ३१ मार्च २०१५

| सन २०१३-१४ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २०१४-१५ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल :** | | ५,००,००,०००.०० |
| २,१७,४४,६००.०० | **वसूल भाग भांडवल :** | | २,४१,३१,५००.०० |
| | **राखीव निधी व इतर निधी :** | | |
| ८६,१६,९०१.०० | राखीव निधी | १,०६,११,६८६.०० | |
| १,६४,९६,८७८.०० | इमारत निधी | २,०२,८५,०६६.०० | |
| ४६,१०,०००.०० | संशयित बुडीत कर्ज निधी | ५३,६०,०००.०० | |
| ५३,९९९.०० | धर्मादाय निधी | ५३,९९९.०० | |
| ४,३५,०००.०० | लाभांश समानिकरण निधी | ५,३५,०००.०० | |
| २,७०,७३९.०० | सभासद कल्याण निधी | ४,५७,४३३.०० | |
| १,६७,०००.०० | सेवक कल्याण निधी | २,४२,०००.०० | |
| ६,२८,२८८.०० | सहकार प्रशिक्षण निधी | ५,१७,८३५.०० | |
| १७,४२,०००.०० | आकस्मिक निधी | २२,४२,०००.०० | |
| १,६५,०००.०० | गुंतवणुक चढउतार निधी | १,६५,०००.०० | |
| ३,५४,०००.०० | रौप्यमहोत्सव निधी | ४,३२.५००.०० | |
| ९,७५,०००.०० | उत्पादित कर्जावरील संभाव्य तरतूद | ११,५०,०००.०० | |
| १२,३८,९६३.०० | माहिती तंत्रज्ञान निधी | २०,६३,९६३.०० | |
| ३,००,०००.०० | निवडणुक निधी | २,०१,३८८.०० | ४,४३,२५,८७०.०० |
| | **सभासद ठेवी :** | | |
| ४,३५,४५,१४९.७६ | बचत ठेव | ५,५६,१०,४८८.४७ | |
| १३,०८,२३,११४.०० | दैनंदिन बचत ठेव | १३,५४,७८,०५४.०० | |
| २८,२७,७०३.०० | सभासद ठेव | ३०,०१,३३८.०० | |
| ५,७६,५६,१५८.०० | अल्प मुदत ठेव | ६,२८,४८,१५०.०० | |
| ४,६२,३८,९८१.०० | मुदत ठेव | ४,०८,९९,३१७.०० | |
| २,५१,९७,२७९.०० | दामदुप्पट ठेव | ३,३९,४७,२१२.०० | |
| १,४१,९६७.०० | पारिजात बक्षीस ठेव | १,३६,९६७.०० | |
| ४,४४,२१,१२५.०० | मासिक प्राप्ती ठेव | ५,६९,८९,६७५.०० | |
| ४०,५१,६९०.०० | आवर्त ठेव | ४३,९९,८२४.०० | |
| ४,४६,५७,३४५.०० | शुभकार्य ठेव | ४,३३,०२,७५५.०० | |
| १,७९,०८,११४.०० | शुभ लक्ष्मी ठेव | २,१२,०४,१५८.०० | |
| ४,५२,४०,५१०.०० | धनवर्षा ठेव | ७९,७२,३२२.०० | |
| २,२३,०३९.०० | पारिजात ठेव | २९,७३९.०० | |
| ६,४५,०६,०७४.०० | वैभवलक्ष्मी ठेव | ८,९४,४७,६५६.०० | |
| २,६८,७६,०४८.०० | धनसंचय ठेव | ४,२६,८७,२१७.०० | |
| २,७६,७३,०६६.०० | धनसमृद्धी ठेव | ७,८४,७३,३६३.०० | ६७,६४,२८,२३५.४७ |
| ६३,९७,८५,७३८.७६ | पुढील पानावर........ | | ७४,५६,८५,६०५.४७ |

## रोजीचे ताळेबंदपत्रक

| सन २०१३-१४ रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २०१४-१५ रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **रोख व बँक शिल्लक :** | | |
| २३,८३,६१३.८५ | रोख शिल्लक | २६,१५,४५१.५४ | |
| २७,३७,४०४.२१ | कॉसमॉस को-ऑप. बँक लि. | ४,७४,६४७.७४ | |
| ११,५७८.३० | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. | ११,५५१.३० | |
| २२,४३१.७३ | दि. ठाणे जि.म.सह.बँक लि. | ४०,३३६.७३ | |
| १०,०१,१००.५१ | सारस्वत को.ऑप. बँक लि. | ९,६७,८३३.५३ | |
| ११,९५,१९१.७० | शामराव विठ्ठल को.ऑप.बँक लि. | १४,१४,४३७.८४ | |
| ३७,३६,२५९.०० | नवी मुंबई को-ऑप.बँक लि. | १५,९३,५४०.०० | |
| ३१,३८,७५८.०५ | अभ्युदय को-.ऑप.बँक लि. | १२,५३,०७७.५६ | |
| ९,९९,६७०.४५ | नॅशनल को-ऑप.बँक लि. | ७,८४,१४५.४५ | |
| ६,११,१७२.०० | राजश्री शाहू सह. बँक लि. | ७,१३१.०० | |
| ४,२२,३९०.६५ | सातारा सहकारी बँक लि. | २,१५,३७८.८५ | |
| ४०,१४७.०० | महानगर को-ऑप. बँक लि. | ६१,२५९.०० | |
| ५,०३४.०० | पंजाब नॅशनल बँक लि. | ८,६८३.९० | |
| २,००,४२२.०० | कल्याण जनता सहकारी बँक लि. | १,५६,२१९.७४ | |
| ९,९४६.४० | अपना सहकारी बँक लि. | २९९.०० | ९६,०३,९९३.१८ |
| | **गुंतवणूक :** | | |
| १,०००.०० | ठाणे जि.मध्य.सह.बँक-भाग | १,०००.०० | |
| ३,०००.०० | महा.रा.सह.पत.फेडरेशन-भाग | ३,०००.०० | |
| १,२१,५६,७७८.०० | ठाणे जि.म.सह.बँक-राखीव व इतर निधी | १,५३,९६,५००.०० | |
| २३,७३,६२५.०० | महाराष्ट्र रा. सह. बँक-राखीव व इतर निधी | १३,१८,६२५.०० | |
| १,८९,८५,६२०.०० | नवी मुंबई को-ऑप.बँक-मुदत व आर्वत ठेव | २,४८,५७,२६९.०० | |
| १,४१,७५,०००.०० | नॅशनल को-ऑप बँक लि.-मुदत ठेव | २,२१,७५,०००.०० | |
| २,०५,१५,०००.०० | शामराव विठ्ठल को.ऑप. बँक - मुदत ठेव | २,६५,१५,०००.०० | |
| ४,२९,१०,०००.०० | अभ्युद्य को-ऑप बँक-मुदत व आवर्त ठेव | ३,३३,१०,०००.०० | |
| २,६५,००,०००.०० | सारस्वत को-ऑप बँक-मुदत ठेव | ७५,००,०००.०० | |
| १,७५,०४,७५०.०० | अपना सहकारी बँक लि.-मुदत ठेव | १,९८,००,०००.०० | |
| ३,१८,७५,०००.०० | महानगर को-ऑप. बँक लि.-मुदत ठेव | १,२३,००,०००.०० | |
| ५०,००,०००.०० | कुर्ला नागरिक सहकारी बँक लि.-मुदत ठेव | ९०,००,०००.०० | |
| ६५,००,०००.०० | पंजाब आणि महाराष्ट्र को. ऑप.-मुदत ठेव | १,७५,००,०००.०० | |
| ३७,००,०००.०० | कल्याण जनता सह बँक -मुदत ठेव | ००.०० | |
| ००.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक - मुदत ठेव | १,८०,००,०००.०० | |
| ००.०० | ठाणे जनता सहकारी बँक लि. मुदत ठेव | २,४०,००,०००.०० | |
| ००.०० | जी. पी. पारसिक सहकारी बँक लि.-मुदत ठेव | ९०,००,०००.०० | २४,०६,७६,३९४.०० |
| | **सभासद कर्जे** | | |
| १,७५,७६,४५९.०० | वैयक्तिक / जामिनकी कर्ज | २,२२,९२,९९८.०० | |
| ००.०० | व्यवसाय कर्ज | ३८,३१,७०४.०० | |
| ७५,१६,७९६.०० | वाहन तारण कर्ज | ५१,७१,७४९.०० | |
| ३०,३८,९९,६५९.०० | सुरक्षित तारण कर्ज | ३५,७७,०१,६३०.०० | |
| ३१,०८,९४०.०० | इतर तारण कर्ज | २३,२६,२५०.०० | |
| ५५,०८,१६,७४६.८५ | पुढील पानावर........ | | २५,०२,८०,३८७.१८ |

दि. ३१ मार्च २०१५

| सन २०१३-१४ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २०१४-१५ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ६३,९७,८५,७३८.७६ | मागील पानावरुन........ | | ७४,५६,८५,६०५.४७ |
| | इतर देणी : | | |
| २३,१२,५४९.०० | ठेवीवरील देय व्याज | २६,०५,८७१.०० | |
| १६,४९,२६५.०० | लाभांश देणे | २१,६६,३९०.०० | |
| १,००,०००.०० | सिक्युरिटी डिपॉझीट | १,००,०००.०० | |
| ६१,३२८.०० | अधिभार (सरचार्ज) देणे | ४१,०१९.०० | |
| ५५०.०० | शेअर्स अनामत खाते | १५,७५०.०० | ४९,२९,०३०.०० |
| | इतर तरतुदी : | | |
| १०,३५०.०० | व्यवसाय कर | ९,९७५.०० | |
| १,०९,१६४.०० | आय कर टि.डी.एस. | १,२७,३३४.०० | |
| १,०७,५६९.०० | सेवक भविष्य निर्वाह निधी | १,०८,८४४.०० | |
| ५,१४,६७७.०० | लेखापरिक्षण फी | ५,१४,४३६.०० | |
| ५,०००.०० | शिक्षण निधी | ०.०० | |
| ८,०८१.०० | कर्मचारी विमा हप्ता | ९,७६६.०० | |
| १२,०५०.०० | टेलिफोन बिल | १२,४५०.०० | |
| ३२,५००.०० | विज बिल | ३९,८००.०० | |
| ६,०००.०० | व्यवसायिक फी | १०,५००.०० | |
| २,८९,४८४.०० | इतर देणी | २९,९७२.०० | |
| १,९०,०००.०० | आयकर तरतूद | ३,२५,०००.०० | ११,८८,०७७.०० |
| ४०,००,०००.०० | थकीत व्याज निधी तरतूद : | | ४६,००,०००.०० |
| | नफा तोटा खाते : | | |
| ३५९.२८ | मागील वर्षाचा शिल्लक नफा | ३९७.८० | |
| ६५,७४,४३८.५२ | अधिक : चालू वर्षाचा नफा | ७६,७७,९०६.५६ | ७६,७८,३०४.३६ |
| ६५,५७,६९,१०३.५६ | एकुण | | ७६,४०,८१,०१६.८३ |

**मे. व्ही. जी. शिंदे ॲण्ड कं.**
चार्टर्ड अकौंटंट - वैधानिक लेखापरिक्षक

**मे. पी. एस. आर. डी. ॲण्ड कं.**
**मे. व्ही. के. बक्षी ॲण्ड कं.**
चार्टर्ड अकौंटंट - अंतर्गत लेखापरिक्षक

**श्री. तानाजी गु. शिंदे**
व्यवस्थापक

## रोजीचे ताळेबंदपत्रक

| सन २०१३-१४ रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २०१४-१५ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ५५,०८,१६,७४६.८५ | **मागील पानावरुन........** | | २५,०२,८०,३८७.१८ |
| | **सभासद कर्जे :** | | |
| ६,१७,६९०.०० | शासकीय रोखे कर्ज | १०,९५,३०२.०० | |
| ५८,९९,५८२.०० | दावा दाखल कर्ज | ८५,६३,४०५.०० | |
| ३१,६७,२७६.०० | कर्मचारी वैयक्तिक कर्ज | ३३,३०,५७९.०० | |
| १,७८,८५१.०० | कर्मचारी वाहन तारण कर्ज | १,५८,२६१.०० | |
| ४९,२०,९६२.०० | कर्मचारी घरतारण कर्ज | ६३,०६,२७४.०० | |
| २२,४२,९३८.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कर्ज | २४,०३,३२२.०० | |
| ४,७४,०९,८०५.०० | ठेव तारण कर्ज | ५,७५,२०,०८४.०० | |
| ५२,३७,०८१.०० | सोने तारण कर्ज | ५७,६४,५४०.०० | ४७,६४,६६,०९८.०० |
| | **मालमत्ता :** | | |
| ३६,२७,३६६.०० | फर्निचर व फिक्चर्स खाते | ३२,८०,३७६.०० | |
| ६,८६,६०२.०० | संगणक खाते | १७,६८,९२३.०० | |
| १,४९,६७७.०० | वातानूकूलीत यंत्रे खाते | १,४६,९४६.०० | |
| ३,३९,०३०.०० | इलेक्ट्रीक साधन सामुग्री खाते | ३,०५,१२८.०० | |
| २,६१,३०६.०० | कार्यालय साधन सामुग्री खाते | ३,७०,६११.०० | |
| ९८,२०,६५२.०० | इमारत खाते | ९५,२९,६१९.०० | |
| ३१,४६९.०० | डेली कलेक्शन मशीन | २२,०२९.०० | |
| ६,९२८.०० | ग्रंथालय खाते | ६,७०९.०० | |
| ५७,११९.०० | इनव्हर्टर खाते | ४८,२८८.०० | |
| ३,५३७.०० | मोबाईल फोन खाते | २,४७६.०० | |
| ००.०० | दुचाकी वाहन खाते | ६२,५६२.०० | १,५५,४३,६६७.०० |
| | **येणे व्याज :** | | |
| ३७,९४,१६०.०० | सभासद कर्जावरील येणे व्याज | ४५,६८,४८५.०० | |
| १,४३,१०,४१३.०० | गुंतवणूकीवरील येणे व्याज | १,४८,८६,६१९.०० | १,९४,५५,१०४.०० |
| | **इतर येणी :** | | |
| ९,२०,०००.०० | कार्यालय अनामत | ९,२०,०००.०० | |
| १२,५५०.०० | दुरध्वनी सुरक्षा ठेव | १२,५५०.०० | |
| ४२,२६०.०० | वीज सुरक्षा ठेव | ४२,२६०.०० | |
| ३,५००.०० | पाणी कनेक्शन ठेव | ३,५००.०० | |
| ५,०००.०० | बि.ई.एस.टी/सुरक्षा ठेव | ५,०००.०० | |
| ३,३४,६७२.०३ | स्टेशनरी स्टॉक | ३,५१,१०४.९७ | |
| ५,८००.०० | मुद्रांक साठा | ४,३००.०० | |
| ६१,७४०.०० | आगाऊ विमा | ६२,८४५.०० | |
| ३,३७८.०० | पॅनकार्ड कुपन्स स्टॉक | २,८९०.०० | |
| ४,८६,५७६.०० | आयकर (२००९-१० ते २०१३-१४) | ६,३४,३४३.०० | |
| १,३३,१०६.०० | कार्यालय नुतनीकरण खर्च | ७८,४७१.०० | |
| १२,८७०.०० | अगाऊ खर्च | ५०,७७५.०० | |
| ४९,६१०.६८ | टी.डी.एस व इतर येणी | ७७,१७१.९८ | |
| ००.०० | लॉकर भाडे | ७,२३७.०० | |
| ००.०० | वेस्टर्न युनीयन मनी ट्रान्सफर | ८,९१२.७० | २२,६१,३६०.६५ |
| | **अॅडव्हान्स :** | | |
| १,१८,८५०.०० | दै. ठेव प्रतिनिधी मशीन अॅडव्हान्स | | ७४,४००.०० |
| **६५,९७,६९,१०३.५६** | **एकुण** | | **७६,४०,८१,०१६.८३** |

| श्री. दिपक शं. टेळे | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कृष्णा पां. धुमाळ |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

दि. ३१ मार्च २०१५

| सन २०१३-१४ रु. पैसे | खर्च | सन २०१४-१५ रु. पैसे |
|---|---|---|
| ३,७४,४८,६४१.०० | सभासद ठेवीवरील व्याज | ४,७५,७१,८४६.०० |
| ३,९४,४५८.०० | अधिकर्ष कर्ज व्याज खर्च | ५,८४,२०८.०० |
| ९८,८२,२३८.०० | कर्मचारी पगार, बोनस व भत्ते | १,०२,४४,४१५.०० |
| ६,७५,७६७.०० | कर्मचारी भ.निर्वाह निधी संस्था अंशदान | ६,९७,५७१.०० |
| ३,९५,९४४.०० | कर्मचारी ग्रुप ग्रॅज्युईटी (एल.आय.सी.) खर्च | २,११,०५८.०० |
| १,१०,६०,९८२.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | १,२१,३७,६८१.०० |
| ८,९६,५७५.०० | कार्यालय भाडे | ९,७५,०२५.०० |
| ५,४४,६९५.१० | स्टेशनरी व दिनदर्शिका छपाई खर्च | ५,९९,०८६.६९ |
| ७०,५६०.०० | वार्षिक अहवाल छपाई खर्च | ७३,२३७.०० |
| २,०८,१२१.०० | किरकोळ खर्च | २,०३,९३३.०० |
| ५,३२,७१२.०० | वीज खर्च | ५,७३,४७९.०० |
| १,४८,८६४.०० | टेलिफोन खर्च | १,५८,९८५.०० |
| २,२२,४२३.०० | प्रवास खर्च | २,५०,१३३.४८ |
| ८७,८९१.०० | विमा खर्च | ९४,२०७.०० |
| ९,६७९.०० | टपाल खर्च | ७,४७२.०० |
| २,६१,९३७.०० | कार्यालय दुरुस्ती व देखभाल खर्च | ३,४४,१४४.०० |
| ६,२५८.०० | कार्यालय पाणी बिल खर्च | ९,०७६.०० |
| २६,५८१.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल खर्च | ५१,३१६.०० |
| ३,४१,९५९.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल खर्च (AMC) | ३,७०,२४९.०० |
| १८,०७५.०० | कार्यालय पेस्ट कंट्रोल (AMC) | १०,९५३.०० |
| १४,८९१.०० | वातानुकूलीत यंत्रे (AMC) | २७,०८०.०० |
| ००.०० | डेली कलेक्शन मशीन (AMC) | ४१,०००.०० |
| ३९,९४८.०० | कार्यालय देखभाल व मालमत्ता कर खर्च | ३९,३५६.०० |
| ९४,५०८.०० | कार्यालय साफसाफाई खर्च | ९३,७७०.०० |
| ४,७५,०००.०० | लेखापरिक्षण फी (शासकीय / अंतर्गत) | ५,००,०००.०० |
| ३६,३४०.०० | व्यावसायिक व कायदे विषयक सल्लागार फी | ३,०९,८२१.०० |
| २,५००.०० | व्यवसाय कर खर्च संस्था | २,५००.०० |
| १,०००.०० | सभासद व वर्गणी | १,०००.०० |
| १४,११०.०० | दिपावली भेट खर्च | १४,०७०.०० |
| १,०८,७५७.०० | पुजा खर्च | ९८,१०३.०० |
| ६,४०,२१,४९४.१० | पुढील पानावर....... | ७,६२,९४,७७५.१७ |

## अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन २०१३-१४ रु. पैसे | उत्पन्न | सन २०१४-१५ रु. पैसे |
|---|---|---|
| ५,४४,००,११५.०० | सभासद कर्जावरील व्याज | ६,४४,१४,४५२.०० |
| १,७६,०२,३८३.७० | गुंतवणूकीवरील व्याज | २,१९,८९,४५९.५० |
| ४,६७,९९१.०० | कर्ज प्रोसेसिंग चार्जेस | ५,५१,६७०.०० |
| १,४८,४९८.०० | कर्ज वसुली चार्जेस जमा | १,८२,११६.०० |
| ४८,०१५.०० | फॉर्म फी, स्टेशनरी चार्जेस इ. | ४१,४२५.०० |
| १५०.०० | लाभांश | १५०.०० |
| ८,२८,९६५.५० | इतर जमा | ९,३९,८९७.३० |
| ७,३४,९६,११८.२० | पुढील पानवर....... | ८,८१,१९,१६९.८० |

दि. ३१ मार्च २०१५

| सन २०१३-१४ रु. पैसे | खर्च | सन २०१४-१५ रु. पैसे |
|---|---|---|
| ६,४०,२१,४९४.१० | **मागील पानावरुन.......** | ७,६२,९४,७७५.१७ |
| ४०,२१८.१६ | बँक चार्जेस खर्च | २९,५९३.८९ |
| ४२,३५२.४२ | सर्विस टॅक्स | ४५,७६९.१८ |
| १०,०४०.०० | कर व परवाना फी | २२,८०७.०० |
| १,२७,९२७.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | १,२९,६२३.०० |
| १,११,३००.०० | संचालक सभा भत्ता खर्च | ९२,७००.०० |
| २,२२५.०० | सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट चार्जेस | २,७२५.०० |
| ९५,७६२.०० | भेट व तपासणी खर्च | १,५६,२८२.०० |
| ७,२९९.०० | लॉकर भाडे | १०,३६३.०० |
| २१,४४२.०० | कर्ज वसुली खर्च | ९८,१०६.०० |
| १,००,७०९.०० | जाहिरात खर्च | ४३,८४५.०० |
| १,९९,५५१.०० | सिक्युरिटी गार्ड खर्च | १,९६,५७४.०० |
| ४९,२०८.०० | मालमत्ता विक्रीतील तुट खर्च | २८,७२६.०० |
| ५४,६३५.०० | कार्यालय नुतनीकरन निर्लेखन खर्च | ५४,६३५.०० |
| ५,०००.०० | शिक्षण निधी खर्च | ००.०० |
| १,००,०००.०० | उत्पादित कर्ज संभाव्य तरतूद | १,७५,०००.०० |
| ३,५०,०००.०० | संशयित व बुडित कर्ज निधी तरतूद | ७,५०,०००.०० |
| २,००,०००.०० | सहकार प्रशिक्षण निधी तरतूद | १,००,०००.०० |
| १,१०,०००.०० | आयकर तरतुद | १,३५,०००.०० |
| २,००,०००.०० | माहिती आणि तंत्रज्ञान निधी तरतुद | ३,२५,०००.०० |
| ००.०० | थकित व्याज निधी तरतूद | ६,००,०००.०० |
| १०,७२,५२१.०० | घसारा | ११,४९,७३९.०० |
| ६५,७४,४३८.५२ | **निव्वळ नफा ताळेबंदास वर्ग** | ७६,७७,९०६.५६ |
| ७,३४,९६,११८.२० | एकुण | ८,८१,९९,९६९.८० |

**मे. व्ही. जी. शिंदे ॲण्ड कं.**
चार्टर्ड अकौटंट - वैधानिक लेखापरिक्षक

**मे. पी. एस. आर. डी. ॲण्ड कं.**
**मे. व्ही. के. बक्षी ॲण्ड कं.**
चार्टर्ड अकौटंट - अंतर्गत लेखापरिक्षक

**श्री. तानाजी गु. शिंदे**
व्यवस्थापक

## अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन २०१३-१४ रु. पैसे | उत्पन्न | सन २०१४-१५ रु. पैसे |
|---|---|---|
| ७,३४,९६,११८.२० | मागील पानावरुन........ | ८,८१,१९,१६९.८० |
| ७,३४,९६,११८.२० | एकुण | ८,८१,१९,१६९.८० |

| श्री. दिपक शं. टेळे | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कृष्णा पां. धुमाळ |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

## वैधानिक लेखापरीक्षकाचा अहवाल : (सन २०१४-२०१५)

(महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा कलम ८१ (५-ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम ६९ अन्वये दयावयचा)

आम्ही पारिजात को-ऑप क्रेडिट सोसायटी मर्यादित, नवी मुंबई या संस्थेच्या दिनांक ३१ मार्च २०१५ रोजीचे ताळेबंद पत्रक आणि त्याच दिवशी संपलेल्या वर्षाचे नफा तोटा पत्रकाचे वैधानिक लेखा परिक्षण करुन सोबत जोडलेली आहेत. हि हिशोबी पत्रके तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. या आर्थिक पत्रकाचे लेखापरिक्षण करुन त्यावर मत प्रदर्शित करण्याची आमची जबाबदारी आहे.

साधारणतः भारतामध्ये स्विकृत झालेल्या लेखापरिक्षण मान्यतानूसार आम्ही संस्थेचे लेखापरिक्षण केलेले आहे. या लेखापरिक्षण मान्यतानूसार आम्ही लेखापरीक्षण कार्यक्रम आखून व त्याप्रमाणे काम करुन विश्वासपूर्वक असे पाहिले आहे की, सदर आर्थिक पत्रकांत कोणतेही महत्वाचे दोष राहू नयेत. लेखापरिक्षणात चाचणी तपासणी तसेच आर्थिक पत्रकांतील रक्कमांच्या संदर्भात कागदपत्रे तपासून या रक्कमा पत्रकांत योग्यरित्या दाखविलेल्या असल्याबद्दलची खात्री करणे, त्याचप्रमाणे मान्यता प्राप्त लेखांकन सिध्दांताप्रमाणे आर्थिक पत्रकांचे मुल्यांकन, अनुमान आणि तसेच ही आर्थिक पत्रके संस्थेच्या व्यवस्थापनाने महत्वपुर्ण अनुमानाप्रमाणे प्रस्तुत केल्याबदलचे मुल्यांकन या लेखापरिक्षणात समाविष्ट आहे. त्यामुळे आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाप्रमाणे वाजवीरित्या मत प्रदर्शित करण्यबद्दल आम्हाला खात्री आहे. त्याप्रमाणे आभिप्राय देतो की :-

१. आमच्या लेखापरिक्षणाच्या संदर्भात, आमच्या ज्ञानाप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे, आम्ही संस्थेकडुन मागितलेली सर्व माहिती व स्पष्टीकरण आम्हाला समाधानकार वाटली.

२. संस्थेच्या ताळेबंद आणि नफा पत्रके हि महाराष्ट्र सहकारी सोसायट्यांच्या कायदा व त्या खालील नियमानुसार तयार केलेली आहेत.

३. संस्थेची ताळेबंद पत्रके व नफा तोटा पत्रके हि संस्थेच्या हिशोबी पुस्तके व विवरणे यां बरोबर मिळती जुळती आहेत.

४. आमच्या मते आम्हास दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार त्याच प्रमाणे या आर्थिक पत्रकावर दिलेल्या स्वतंत्र टिपणीनुसार, प्रतिवृत्तांवरील विभाग 'अ' 'ब' 'क' मधील शेऱ्यास पात्र राहून तसेच भारतामध्ये साधारणतः स्विकृत असलेल्या लेखापरिक्षण मान्यतानुसार :

   अ) ताळेबंद पत्रक सोसायटीची दि. ३१ मार्च २०१५ ची खरी व योग्य स्थिती दाखवत आहे आणि

   ब) नफा तोटा पत्रक दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षाच्या खरा व योग्य नफा दर्शविते.

५. सन २०१४-१५ सालाकरिता संस्थेस लेखापरिक्षण वर्ग **'अ'** देण्यात आला आहे.

६. वरील दाखला प्रसारित करण्यात येणाऱ्या लेखापरीक्षण प्रतिव्रतांवरील विभाग अ ब क मधील शेऱ्यास पात्र राहून देण्यात येत आहे.

**मे. व्ही. जी. शिंदे ॲण्ड कं.**
चार्टर्ड अकौंटंट
सही/-

स्थळ : नवी मुंबई

दिनांक : २० /०७ / २०१५

**मे. व्ही. जी. शिंदे**
प्रोपायटर

## अंदाज पत्रक सन २०१५-२०१६

( ₹ लाखात)

| उत्पन्न तपशिल | अंदाजे उत्पन्न २०१४-१५ | प्रत्यक्ष उत्पन्न २०१४-१५ | अंदाजे उत्पन्न २०१५-१६ |
|---|---|---|---|
| सभासद कर्जावरील व्याज | ६२९.६९ | ६४४.१५ | ७७०.०० |
| गुंतवणुकी वरील व्याज व लाभांश | २०८ | २१९.८९ | २४५.०० |
| इतर उत्पन्न | १६.९६ | १७.१५ | १८.५० |
| एकूण रू. | ८५४.६५ | ८८१.१९ | १०३३.५० |

| खर्च तपशिल | अंदाजे खर्च २०१४-१५ | प्रत्यक्ष खर्च २०१४-१५ | अंदाजे खर्च २०१५-१६ |
|---|---|---|---|
| सभासद ठेवीवरील व्याज * | ४३८.१५ | ४७५.७२ | ५८०.०० |
| कर्मचारी पगार, बोनस, भ.निर्वाह निधी व ग्रज्युईटी खर्च | ११४.८५ | १११.५३ | १२०.५० |
| दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन* | १२०.०० | १२१.३८ | १३२.५० |
| छपाई व स्टेशनरी, अहवाल व कॅलेंडर छपाई खर्च | ७.५० | ६.७२ | ९.०० |
| वार्षिक सभा व संचालक सभा भत्ता खर्च | ३.०० | २.२३ | ३.२५ |
| प्रवास व किरकोळ, दिवाळी भेट,गणवेश, व्हिजीट खर्च | ८.५० | ६.२४ | ९.६० |
| विमा व पोस्टेज खर्च | १.७५ | १.०२ | १.७५ |
| विज, फोन, पाणी, मालमत्ता कर, कार्यालय भाडे, सर्विस टॅक्स, लायसन्स फी व मेंटेनन्स चार्जेस | २०.२१ | १८.२४ | २१.५० |
| देखभाल व दुरुस्ती, पुजा, उद्घाटन, पुजा व साफसफाई खर्च व सिक्युरिटी गार्ड खर्च | १२.०० | ७.८६ | ११.०० |
| ऑडिट फी खर्च | ५.८० | ५.०० | ५.०० |
| AMC वर्गणी, व्यवसाय कर कायदेशीर फी व ब्रोकरेज | ८.५० | ७.६२ | ९.९० |
| ओव्हर ड्राप्ट कर्ज व्याज, बॅंक चार्जेस व लॉकर भाडे | ७.३६ | ६.२४ | ८.२५ |
| कर्ज वसुली व जाहिरात खर्च | ३.२० | १.४३ | ३.७५ |
| घसारा खर्च * | १०.५० | ११.५० | १३.५० |
| तरतुदी (शिक्षण निधी, बुडीत कर्ज निधी व थकित व्याज निधी, उत्पादित कर्ज सभाव्य तरतूद, सहकार प्रशिक्षण निधी तरतूद, आकस्मिक निधी तरतूद, माहिती तंत्रज्ञान निधी) | १२.०५ | २०.८५ | १२.२५ |
| अन्य खर्च (सॉफ्ट. डेव्ह., संगणक दुरुस्ती, मालमत्ता निर्लेखन, मालमत्ता विक्रीतील तूट खर्च) | ३.५० | ०.८३ | १.५० |
| नफा | ७७.७८ | ७६.७८ | ९०.२५ |
| एकुण रु. | ८५४.६५ | ८८१.१९ | १०३३.५० |

* अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मा. संचालक मंडळाने मासिक सभेत मंजुरी दिली असुन वार्षिक सभेत सदर खर्चास मंजुरीसाठी शिफारस करत आहे.

# उपविधी पोटनियम दुरुस्ती

**(उपविधी पोटनियम दुरुस्ती क्र. अ.३ व ५३ परिशिष्ठ क्र. ४)**

| उपविधीचा अनुक्रमांक | सध्याच्या उपविधीची शब्दयोजना | दुरुस्त उपविधीची शब्दयोजना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| नियम अ-३ | **संस्थेचे कार्यक्षेत्र :-** संस्थेचे कार्यक्षेत्र ठाणे, बृहन्मुंबई, रायगड व पुणे जिल्ह्या पुरते मर्यादित आहे | **संस्थेचे कार्यक्षेत्र :-** संस्थेचे कार्यक्षेत्र ठाणे, बृहन्मुंबई रायगड, पुणे, सातारा सोलापूर व नाशिक जिल्ह्यापुरते मर्यादित राहील. | बरेचसे सभासद व्यवसायानिमित्त सातारा, सोलापूर व नाशिक जिल्ह्यात स्थायिक झाल्याने व ग्रामीण भागात सभासदांना बचतीस प्रोत्साहन देणे तसेच गरजुना कर्ज वितरण करणे व कर्ज वसुली करणेसाठी |
| नियम ५३ परिशिष्ट क-४ | **ड. व्यावसायिक कर्जः** व्यावसायिक कर्जाची मुदत जास्तीत जास्त ८४ महिने राहिल. | व्यवसायिक कर्जाची मुदत जास्तीत जास्त १२० महिने राहिल. | नवीन आदर्श उपविधी २०१३ नुसार कर्जाची महत्तम मर्यादा रु. ४०,०० लाख असल्यामुळे व सभासदांची मुदत वाढीची मागणी असल्याने त्यांच्या गरजांची पुर्तता करता यावी म्हणून. |
| नियम ५३ परिशिष्ट क-४ | **ऐ. अस्तित्वात नाही :** पगार कपात तारण कर्ज | जो सभासद आपल्या पगारातुन कर्ज परत फेडीची हमी/वसुली देईल असा सभासदांसाठी पगार कपात तारण कर्जाची जास्तीत जास्त कर्ज मर्यादा रु.३.०० लाख राहील. | १. सभासदांची मागणी असल्याने त्यांच्या गरजांची पुर्तता करता यावी म्हणुन.<br>२. इतर आर्थिक संस्थामधून पगार कपात कर्ज दिले जाते, त्याचप्रमाणे संस्थेला देता यावे म्हणुन. |


# पारिजात
**को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.**

**केंद्र शासनाच्या आयकर विभागाने बंधनकारक केलेले**



# पॅनकार्ड



**आता पारिजात संस्थेमार्फत सर्व नागरीकांस उपलब्ध**

**पतसंस्थेच्या माध्यमातून अशी सेवा देणारी 'पारिजात' पहिली व एकमेव संस्था.**

## परिशिष्ट - 'अ'

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नांव | : | **पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई** |
| मुख्य कार्यालय | : | पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर-१० ए, नेरुळ (प.)<br>नवी मुंबई - ४०० ७०६. |
| नोंदणी क्रमांक | : | टी.एन.ए./(टी.एन.ए.)/आर.एस्.आर./(सी.आर.)/९५१-सन १९९७ |
| कार्यक्षेत्र | : | बृहन्मुंबई, ठाणे, रायगड व पुणे जिल्हा |
| शाखा | : | नऊ (प्रशासकीय कार्यालय व्यतिरिक्त नऊ शाखा) |
| सभासद संख्या | : | ८४३१ |
| अधिकृत भाग भांडवल | : | रु. ५,००,००,०००.०० |
| वसुल भाग भांडवल | : | रु. २,४९,३१,५००.०० |
| राखीव व इतर निधी | : | रु. ४,४३,२५,८७०.०० |
| ठेवी | : | रु. ६७,६४,२८,२३५.४८ |
| कर्जे | : | रु. ४७,६४,६६,०९८.०० |
| बाहेरील कर्जे | : | नाही |
| गुंतवणूक | : | रु. २४,०६,७६,३९४.०० |
| लेखापरिक्षण वर्ग | : | "अ" |
| अहवाल सालातील नफा | : | रु. ७६,७८,३०४.३६ |
| कर्मचारी वर्ग | : | ५३ |
| खेळते भांडवल | : | रु. ७६,४०,८१,०१६.८३ |

# ठेव योजना

## मुदत ठेवीवरील व्याजदर

| | |
|---|---|
| ३० दिवस ते ४५ दिवस | ७.५० % |
| ४६ दिवस ते ९० दिवस | ८.५० % |
| ९१ दिवस ते १८० दिवस | ९.०० % |
| १८१ दिवस ते ३६४ दिवस | ९.५० % |
| १ वर्ष ते २ वर्षापेक्षा कमी | १०.५० %* |
| २ वर्ष ते ३ वर्षापेक्षा कमी | ११.०० %* |
| ३ वर्ष ते ४ वर्षापेक्षा कमी | ११.२५ %* |
| ४ वर्ष ते अधिक | ११.०० %* |

* एक वर्ष व त्यापेक्षा अधिक मुदतीसाठी जेष्ठ नागरिक/ अपंग/ विधवा/ हौसिंग सोसायटी यांना ½% अधिक व्याज

## धनसंचय ठेव

१५१ दिवसांकरीता
१०.००%
व्याजदर द.सा.द.शे.

## धनसमृध्दी ठेव

१५ महिन्यांकरीता
११.२५%

## वैभवलक्ष्मी ठेव योजना

२५ महिन्यांकरीता
११.५०%

## विविध ठेव योजना

### शुभलक्ष्मी ठेव योजना

| मासिक ठेव रक्कम | ३६ महिन्यानंतर मिळणारी रक्कम |
|---|---|
| रु. ५,०००/- | रु. २.०० लाख |
| रु. २,५००/- | रु. १.०० लाख |
| रु. १,२५०/- | रु. ५० हजार |

### शुभकार्य ठेव योजना

| दरमहा | भरा | मिळवा |
|---|---|---|
| रु. ६००/- | फक्त ६६ महिने | रु. ५०,०००/- |
| रु. १२००/- | | रु.१,००,०००/- |

### आवर्त ठेव योजना

| कालावधी | व्याजदर | कालावधी | व्याजदर |
|---|---|---|---|
| १२ महिने | १०.००% | ३६ महिने | १०.५०% |
| २४ महिने | १०.२५% | ४८ महिने | ११.०० % |

### मासिक प्राप्ती योजना

| मुदत वर्षे | ठेव रक्कम (सर्वसाधारण) | ठेव रक्कम (ज्येष्ठ नागरिक/अपंग/विधवा) | दरमहा मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|
| १ वर्षे ते २ वर्षापेक्षा कमी | रु. १,१४,३००/- | रु. १,०९,१००/- | रु. १,०००/- |
| २ वर्षे ते ३ वर्षापेक्षा कमी | रु. १,०९,१००/- | रु. १,०४,३५०/- | रु. १,०००/- |
| ३ वर्षे ते ४ वर्षापेक्षा कमी | रु. १,०६,७००/- | रु. १,०२,१५०/- | रु. १,०००/- |

### दामदुप्पट ठेव योजना आपली रक्कम ७७ महिन्यात दामदुप्पट







### स्वप्नपूर्ती ठेव योजना

| ठेव रक्कम | १२० महिन्यानंतर मिळणारी रक्कम (दाम तिप्पट) |
|---|---|
| ₹ ५,०००/- | ₹ १५,०००/- |
| ₹ १०,०००/- | ₹ ३०,०००/- |
| ₹ २५,०००/- | ₹ ७५,०००/- |
| ₹ ५०,०००/- | ₹ १,५०,०००/- |
| ₹ १,००,०००/- | ₹ ३,००,०००/- |




### शुभसंकल्प ठेव योजना

| मासिक ठेव रक्कम | १२० महिन्यानंतर मिळणारी रक्कम |
|---|---|
| ₹ १,०००/- | ₹ २,१०,०००/- |
| ₹ २,०००/- | ₹ ४,२०,०००/- |
| ₹ ३,०००/- | ₹ ६,३०,०००/- |
| ₹ ४,०००/- | ₹ ८,४०,०००/- |
| ₹ ५,०००/- | ₹ १०,५०,०००/- |

# संस्थेच्या विविध कर्ज योजना



### वैयक्तिक / जामिनकी कर्ज

मर्यादा : रू. १.०० लाख
कालावधी : ६० महिने
व्याजदर : १७%



### पगार कपात कर्ज (सेक्शन ४९)

मर्यादा : रू. १.०० लाख
कालावधी : ६० महिने
व्याजदर : १५%



### वाहन तारण कर्ज

मर्यादा : रू. १५.०० लाख
कालावधी : ८४ महिने
व्याजदर : १५%



### व्यावसायिक कर्ज

मर्यादा : रू. ४०.०० लाख
कालावधी : ८४ महिने
व्याजदर : १५%



### सुरक्षित तारण कर्ज

मर्यादा : रू. ४०.०० लाख
कालावधी : १८० महिने
व्याजदर : १५%



### गृह खरेदी कर्ज

मर्यादा : रू. २५.०० लाख
कालावधी : १८० महिने EMI
व्याजदर : १४%



### घर बांधणी/ दुरुस्ती कर्ज

मर्यादा : रू. २५.०० लाख
कालावधी : १८० महिने
व्याजदर : १५%



### सोने तारण कर्ज

मर्यादा : रू. ५.०० लाख
कालावधी : १२ महिने
व्याजदर : १३.५०%



### एल.आय.सी. तारण कर्ज

मर्यादा : रू. १५.०० लाख
कालावधी : १२ महिने
व्याजदर : १५%

अधिक माहितीसाठी संस्थेच्या नजिकच्या शाखेत संपर्क साधावा.



# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

# विद्यार्थी गौरव सोहळा

## सन २०१४-१५



सभासदांच्या हुशार मुलांचा गुणगौरव वार्षिक सर्व साधारण सभेत केला जाणार आहे. सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेत कमीत कमी ७०% गुण असलेल्या मुलांचे अर्ज दिनांक०३/०८/२०१५ पर्यंत संस्थेच्या शाखा कार्यालयात जमा करावेत. अधिक माहितीसाठी शाखा कार्यालयात संपर्क साधवा.

## संस्थेचे गत पाच वर्षातील आर्थिक प्रगती

| सन | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ | २०१३-२०१४ | २०१४-२०१५ |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | १,५७,८८,८०० | १,७५,७८,५०० | १,९७,७२,००० | २,१७,४४,६०० | २,४९,३१,५०० |
| गुंतवणूक | ९,०२,६२,०९४ | १०,४१,३८,००९ | १५,५६,०८,०८२ | २०,२१,९९,७७३ | २४,०६,७६,३९४ |
| ठेवी | ३४,९७,६८,८३३ | ४०,०५,६६,५७५ | ४९,३७,३६,४१६ | ५८,१९,८७,३६२ | ६७,६४,२८,२३५ |
| कर्जे | २६,३१,३४,३७८ | ३१,०७,२८,८०७ | ३६,१६,२८,३१५ | ४०,१७,७६,०३९ | ४७,६४,६६,०९८ |
| खेळते भांडवल | ३९,२१,५१,७१२ | ४५,१०,५८,६०१ | ५५,६६,६५,७६५ | ६५,५७,६९,१०३ | ७६,४०,८१,०१६ |

### सभासदांना सूचना :-

- सभासदाने आपला पत्ता बदलल्यास नवीन पत्त्याविषयी कार्यालयास लेखी सूचना त्वरीत करावी.
- ज्या सभासदांनी आपले वारस नेमले नसतील त्यांनी अपले वारस नेमून घ्यावेत.
- सर्व सभासदांचे लाभांश व भाग दाखले तयार आहेत ते संबंधीत शाखेतून घेऊन जावेत.
- कर्ज मागणी करताना सभेपूर्वी ३ दिवस अगोदर कर्ज मागणी अर्ज शाखेत जमा करावेत.
- पूर्ण भरलेले व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेले अर्ज कर्ज मंजूर सभेत ठेवले जातील.
- आपण घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरा व संस्थेस सहकार्य करा.
- प्रत्येक महिन्याच्या शेवटी आपले कर्ज, दैनंदिन ठेव, आर. डी. या बाबतचे पासबुकावर संस्थेत येऊन अधिकाऱ्यांची सही घ्यावी.
- संस्थेच्या व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने आपला सल्ला व मार्गदर्शन लेखी स्वरुपात कळवा.





संस्थेचे सर्वोत्कृष्ट दैनंदिन ठेव प्रतिनिधी श्री. विशाल प्रल्हाद सातव यांचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष श्री. कृष्णा धुमाळ आणि संचालक मंडळ

संस्थेने आयोजित केलेल्या विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थिनी कु. दिपाली टेळे हिस स्मृतीचिन्ह व पारितोषिक देताना मा. संचालक श्री. कैलास खोपडे







सन २०१३-१४ चा सर्वोत्तम शाखा पुरस्कार स्विकारताना वाशी शाखेचे शाखाधिकारी, कर्मचारी व दैनंदिन ठेव प्रतिनिधी

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या व्यवसाय वाढीसंदर्भात लोणावळा, येथे आयोजित संयुक्त शिबीरास उपस्थित मा. संचालक, अधिकारी व कर्मचारी



# आपल्या सेवेत कार्यरत आमच्या शाखा

## मुंबई विभाग

| | |
|---|---|
| वाशी | अे-३/७, सेक्टर-१५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३. फोन : २७८० २६५९ / ३२०८ ६६६४. |
| नेरुळ | साईप्रसाद शॉपिंग कॉम्प्लेक्स, शॉप नं. २८, प्लॉट नं. १७, सेक्टर -८, नेरुळ, नवी मुंबई - ४०० ७०६. फोन : ३२५९ ६९८५. |
| दादर | मगनलाल डी-बिल्डींग, रुम नं. १६, पहिला मजला, कबुतरखान्याजवळ, स्टेशन रोड, दादर (प.), मुंबई - ४०० ०२८. फोन : ३२०८ ६६६५. |
| कोपरखैरणे | के. पी. हेरिटेज को-ऑप.हौ.सो., शॉप नं.१४, प्लॉट नं.४१, सेक्टर-७, पोस्ट ऑफिस समोर, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४०० ७०९. फोन : ३२४८ ६८०६. |
| न्यु पनवेल | ओमश्री निकेतन को-ऑप.हौ.सो., शॉप नं. ८, प्लॉट नं.१२ए, सेक्टर-१, महात्मा शाळेसमोर, खांदा कॉलनी, न्यु पनवेल - ४१० २०६. फोन : ३२६७४६५८. |

## पुणे विभाग

| | |
|---|---|
| धनकवडी | सरस्वती मंगल कार्यालय, पहिला मजला, सर्व्हे नं.-२९/१, पुणे-सातारा रोड, धनकवडी, पुणे - ४११ ०४३. फोन : ०२०-३२९० ६७४६. |
| हडपसर | शॉप नं. ४१, अमर समृद्धी कॉम्प्लेक्स, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापुर रोड, हडपसर, पुणे - ४११ ०२८. फोन : ०२० - ३२५१ ७६७१. |
| सिंहगड रोड | सुर्या प्लाझा, शॉप नं.१०, पहिला मजला, सर्वे नं.-८, धायरी रोड, वडगाव खुर्द, पुणे - ४११ ०४१. फोन : ०२०-३२५३ ११०२. |
| चंदननगर | बेंद्रे बिल्डींग, पहिला मजला, सर्व्हे नं.-४६/१, संघर्ष चौक, खराडी रोड, चंदननगर, पुणे - ४११ ०१४. फोन : ३२३१ १७२२. |

प्रेषक :

**पारिजात**
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
पारिजात भवन, प्लॉट नं.१८, सेक्टर १० ए, नेरुळ (प.),
नवी मुंबई-४०० ७०६. फोन : ३२५९६९९०/२७७०५१२७
Email : parijatsociety@rediffmail.com / parijatsociety@gmail.com

बुक-पोस्ट

प्रति,